आर.सी.सी.६८२/२०१३
निशाणी क्र – ३८

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.१.ची साक्ष
खुदा कसम सच कहुंगी की,

नाव : शिरिण शोएब शेख,
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी,
राहणार : सांवत नगरी, बोपोडी पुणे.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती आम्रपाली कस्तुरे :-</u>**

आरोपी क्र.१ माझे सासरे आहेत. आरोपी क्र.२ माझी सासू आहे. आरोपी क्र.३ माझा पती आहे. माझे आरोपी क्र.३ सोबत दि.०९.०९.२०१२ मध्ये पुणे येथे लग्न झाले. लग्नामध्ये आम्ही आरोपींना एक तोळयाचे लॉकेट, एक तोळयाची सोन्याची चैन व घडयाळ दिले.

२. लग्नानंतर मी आरोपींचे घरी एकत्र कुटूंबात कोंढवा येथे नांदण्यासाठी गेले. सुरुवातीचे दोन ते तीन महिने मला चांगले नांदविले. त्यानंतर हुंडयामध्ये सोफा सेट, डॉयनिंग टेबल, मॉयक्रो वेव्ह इत्यादी वस्तू आणल्या नाहीत म्हणून आरोपींनी मानसिक त्रास देण्यास सरुवात केली. मोहसिना माझी नंणद आहे. मोहसीना हिला ऑस्ट्रेलिया येथे जायचे होते म्हणून आरोपी माझ्याकडे दोन लाख रक्कमेची मागणी करीत होते. मी आरोपींना इतकी रक्कम नसल्याची सांगितले. त्यावरुन भांडण व शिवीगाळी सुरु झाली. आरोपी क्र.३ ने माझेवर मारणेसाठी हात उचलला. आरोपी क्र.१ व २ मला सतत शिवीगाळी करीत होते व मानसिक त्रास देत होते. सदर त्रासाबबात मी माझ्या आई-वडीलांना, मावशीला, व मावशीचा मुलगा शहनवाज शेख यांना सांगितले. दि.१०.०२.२०१३ चे आसपास माझे आई वडील, माझी मावशी व मावशीचा मुलगा शहनवाज शेख असे आरोपींना समजविण्यासाठी माझ्या सासरी आले होते. परंतु आरोपींनी त्यांचा अपमान करुन त्यांना घराबाहेर काढले. त्यानंतर आरोपींनी माझ्यासोबत भांडण करुन मला बाहेर काढले. त्यानंतर समजोता करण्यासाठी आम्ही बरेच प्रयत्न केले. दि.२३.०२.२०१३ ते दि.३१.०३.२०१३ चे दरम्यान मला नांदविण्यासाठी मी, माझे आई वडील, माझी मावशी व मावशीचा मुलगा शहनवाज शेख यांनी बरेच प्रयत्न केले. परंतु आरोपींनी घरी घेतले नाही. म्हणून मी पोलीस आयुक्त कार्यालय महिला अत्याचार निवारण केंद्र, पुणे, येथे अर्ज दिला. आता मला दाखवण्यात आलेला अर्ज तोच आहे. त्यावर

माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र.३९ देण्यात येते. सदर अर्जावरुन पोलीसांनी मला व माझ्या आई वडीलांना बोलावले. तसेच आरोपींना देखील बोलावले. परंतू तेथे समजोता झाला नाही. त्यानंतर मी फिर्याद दाखल करण्यासाठी कोंढवा पोलीस ठाण्यात अर्ज दिला. त्यानंतर पोलीसांनी फिर्यादी जबाब नोंदविला. आता मला दाखविण्यात आलेला फिर्यादी जबाब तोच आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरेबर आहे. त्याला नि.क्र.४० देण्यात येते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकते. आरोपी क्र.१ न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.अे.अे.अशरफी यांचे तर्फे -</u>**

आता मला फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. त्यामध्ये एक तोळयाची चैन असा उल्लेख नाही. मी पोलीसांकडे फिर्यादी जबाब देताना आम्ही आरोपींना एक तोळयाची चैन दिली असे सांगितले होते अगर कसे ते मला आठवत नाही. फिर्यादी जबाबावर सही करण्यापुर्वी त्यातील मजकूर मी वाचला होता. मी फिर्यादी जबाब देताना सोफा सेट दिला नाही म्हणून आरोपींनी त्रास दिला असे सांगितले होते. परंतु तसे फिर्यादी जाबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणण खरे नाही की, आम्ही आरोपींना लग्नामध्ये लॉकेट, चैन, घडयाळ व सोफा सेट इत्यादी वस्तू दिल्या नसल्यामळे तसेच नंणदेला ऑस्ट्रेलियाला जाण्यासाठी आरोपींनी दोन लाख रुपये मागितले नसल्यामुळे व आरोपी क्र.३ ने मला मारले नसल्यामुळे त्यांचा उल्लेख मी नि.क्र.३९ कडील अर्जात केला नाही. लग्नाचे वेळी आमची आर्थिक परिस्थीती आरोपींच्या आर्थिक परिस्थीती पैक्षा कमी होती अगर कसे ते मी सांगू शकत नाही. आरोपींच्या आर्थिक परिस्थीतीबाबत आम्ही चौकशी केली नव्हती. माझे वडील खाजगी कुक आहेत. लग्नाचे वेळी माझे वडीलांचे नावे घर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्या वेळी मी आरोपी क्र.३ एकाच ठिकाणी एलेक्झर येथे कामाला होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी एचआर होते व आरोपी क्र.३ दुस-या विभागात होता. लग्नापुर्वी दिड वर्षापासून मी आरोपी क्र.३ ला ओळखत होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नापुर्वी मी आरोपी क्र.३ भेटत होते, जेवणासाठी जात होतो व बागेत जात होतो, व पिचरला जात होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी व आरोपी क्र.१ ची मैत्रीण प्रेमामध्ये बदलली व त्यानंतर लग्न झाले. सोन्याची चैन,

लॉकेट, डॉयनिंग टेबल व मायक्रो वेव्ह व घडयाळ खरेदीच्या पावती पोलीसांनी मागतिल्या नाही व आम्ही दिल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना सोन्याची चैन, लॉकेट, डॉयनिंग टेबल व मायक्रो वेव्ह व घडयाळ इत्यादी वस्तू दिलेल्या नाहीत. लग्नाची वेळी आरोपींनी कोणतीही मागणी केली नवहती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी लग्नाच्यावेळेस आम्हाला अकरा जोडी कपडे व सोने दिले होते. सोन्यामध्ये एक नेकलेस व कानातील रिंग इत्यादी वस्तू होत्या. तो सोन्याचा सेट तीन तोळयाचा होता अगर कसे याची मला माहिती नहाी. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी दोनशे ते अडीशे लोकांना रिशेपशनला बोलावले होते. किती लोकांना बोलावले होते ते मला सांगता येणार नाही. मी लग्नापुर्वी आरोपी क्र.२ सोबत खरेदीसाठी मुंबई येथे गेले होते. तेथे कपडयाची खरेदी झाली. ती खरेदी किती रुपयांची झाली त्याची मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, लग्नापुर्वी रिशेपशनला किती खर्च करायचा याची मला माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, मी लग्नापुर्वी मुंबई येथे आरोपी क्र.२ सोबत गेले होते त्यावेळी डोंगरी येथील मोहसीना यांच्याकडे गेले होते. मोहसीना हिचा डोंगरी येथे व्यवसाय आहे अगर कसे यांची मला माहिती नाही. मोहसीना हिचा डोंगरी येथे दोन कोटीचे घर व दोन कोटीचे व्यवसाय आहे अगर कसे यांची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोहसीनाच्या नव-यांचे नाव मर्चन्ट आहे. मोहसीनिच्या नव-यांचा भाऊ आठ ते दहा वर्षापासून ऑस्ट्रेलिया येथे राहतो अगर कसे यांची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोहसीनिला ऑस्ट्रेलियाला जाण्यासाठी दोन लाख रुपये मागितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मायक्रो वेव्ह इत्यादी वस्तू मागितल्याची तारीख मला माहित नाही तसेच आरोपींनी दोन लाख कधी मागितले त्याची तारीख वेळ व वार मला माहित नाही. मारहाणीची घटना घडल्याचे तारखा वेळ व वार मला सांगत येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.३१.१२.२०१३ पर्यत आरोपींनी कुठलाही त्रास दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ ते ३ तिघेपण नोकरी करतात. आरोपींचे दरमहा उत्पन्न सत्तर ते ऐंशी हजार होते अगर कसे यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.३ ला रुपये वीस हजार पगार असू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्या वेळी आरोपी क्र.२ रोजरी शाळेत शिक्षक होत्या. मला आरोपी क्र.१ व २ यांच्या पदवीबाबत माहित नाही. परंतू आरोपी क्र.३ बीकॉम आहेत.

आरोपीचे वकीलांचे तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकूब.

वरील जबाब साक्षीदारास वाचुन दाखवला. तो त्यांनी त्यांच्या सांगणेप्रमाणे नमुद केल्याचे कथन केले.

समक्ष,

सही/-

दिनांक : २१/१०/२०२४.

(अ.अ.कुलकर्णी)
२रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.